# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 01 / 08 / 2023 (मंगळवार) दुपार

---

### सदोष मनुष्यवध

**पो.स्टे. कोंढाळी** :— अंतर्गत १३ कि. मी. अंतरावरील खापरी चंदनपार्डी फाटा येथे दिनांक ३१/०७/२०२३ चे ११. २० वा. सुमारास यातील चारचाकी महींद्रा झायलो एम. एच.— ०३ बी. सी.— ५८६२ चे अज्ञात वाहन चालकाने त्याचे प्रवासी वाहनात अवैदयरीत्या कत्तल करण्याचे उद्देशाने गाई व बैल अशी एकूण ९ जनावरे निर्दयतेने कोंबून त्याचे वाहन भरधाव वेगाने चालविल्याने वाहनाचे तोल बिघडुन एखादया वाहनास धडक होऊन पुढच्या वाहन चालकाचे मृत्यू घडून येण्याची त्यास पूरेपूर जाणीव असून सूद्धा अज्ञात वाहन चालकाने त्याचे वाहन अतिशय भरधाव वेगाने चालवून दि. ३१/०७/२०२३ रोजी सकाळी ११/२० वा. चे सुमारास पोस्टे कोंढाळी जिल्हा नागपूर ग्रामीण हद्दीतील खापरी बारोकर गावासमोरील खापरी चंदनपार्डी फाटयाजवळ नागपूर ते अमरावतीकडे जाणाऱ्या महामार्गावरून जाणाऱ्या दूचाकी होंडा यूनीकॉर्न क्र. एम. एच.— ४०/सी. एफ— ९४८० ला मागून धडक देवून दूचाकी चालक नामे— पूष्पराज गणपत ढोबळे, वय ४६ वर्ष, रा. चिचोली जूनापाणी याचा मृत्यू घडून आाणून सदोष मनूष्यवध केला आहे.

सदर प्रकरणी सरकारतर्फे फिर्यादी नामे— पोहवा किशोर मारोती नारायणे, वय ४२ वर्ष ब. नं. २१८ नेम. महामार्ग पोलीस केंद्र खूर्सापार जि. नागपूर ग्रामीण यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. कोंढाळी येथे आरोपीविरुध्द कलम ३०४ भादंवी सहकलम ५ अ प्राणी संवर्धन कायदा १९७६, ११(१) ड प्राण्यांना निर्दयतेने वागविण्यास प्रतिबंध अधिनियम १९६०, ५ (अ) १ प्राणी संरक्षण सूधारणा अधिनियम, सहकलम ११९५, सहकलम १८४, १३७/१८७ मोवाका. सहकलम महाराष्ट्र पोलीस कायदा ११९ कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक महादेव सुरजुसे पोस्टे कोंढाळी मो. नं. ७६६६६४०२१८ हे करीत आहे.

### पळवून नेणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल

**पो.स्टे. अरोली** :— दिनांक ३०/०७/२०२३ चे रात्री ०९.३० वा. ते दिनांक ३१/०७/२०२३ चे १२.०० वा. सुमारास पो.स्टे. अरोली हद्दीत फिर्यादी व फिर्यादीचे घरचे सर्व कुटुंब जेवण करून घरीच समोरच्या खोलीमध्ये झोपले असता दि. ३१/०७/२०२३ रोजी रात्री १२.०० वा. दरम्यान फिर्यादीला झोपेतून जाग आली. तेव्हा फिर्यादीला मोठी मुलगी दिसून आली नाही. त्यावेळी फिर्यादीला वाटले की, फिर्यादीचे घराशेजारी राहणारा फिर्यादीचा लहान भाऊ संदिप रमेश गजबे यांच्याकडे झोपायला गेली असेल म्हणून फिर्यादी व फिर्यादीची पत्नी फिर्यादीचे भावाचे घरी जावून मोठया मुली बाबत विचारपुस केली. परंतु त्याने मोठी मुलगी त्याच्याकडे आली नसल्याचे सांगितले. त्यामुळे फिर्यादीने मोठया मुलीचा गावातील रस्त्याने तसेच रामटेक कडे जाणाऱ्या रोडने तिचा शोध घेतला. तसेच नातेवाईकांच्या घरी शोध घेतला परंतु ती मिळून आली नाही. फिर्यादीची मोठी मुलगी ही **संशयित आरोपी नामे— सोनु राजु डोईफोडे, रा. बेरडेपार** याच्यासोबत पळुन गेली असल्याचे फिर्यादीला संशय असल्याने फिर्यादीने त्याच्या गावातील लोकांना फोन करून त्यांच्याबाबत चौकशी केली असता तो रात्रीपासुन गावात नसल्याची माहीती मिळाली फिर्यादीची मोठी मुलगी वय १५ वर्ष हीचे मागील १ वर्षापासुन बेरडेपार येथील सोनु राजु डोईफोडे याच्यासोबत प्रेमसंबंध होते. त्याने दि. ३०/०७/२०२३ चे ९/३० वा. ते दि. ३१/०७/२०२३ रोजी रात्री १२/३० वा. फिर्यादीचे मुलीच्या अज्ञानतेचा फायदा घेवुन तिला फुस लावुन पळवुन नेले आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. अरोली येथे आरोपीविरुध्द कलम ३६३ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक सोनवणे मो. नं. ८२०८५४४२६८ हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**